महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, मुंबई विभागीय मंडळ,
बृहन्मुंबई महानगरपालिका प्राथमिक शाळा, जोगळेकरवाडी, शीव(पूर्व),
मुंबई - ४०० ०२२,

= = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = =

दूरध्वनी क्रमांक:-वि. अ. ४०८९६५४
वि. स. ४०७७८५४

क्र. मुंविमं/मान्यता-उच्च माध्य./९७६.
मुंबई-४०० ०२२.
दिनांक:- २५/९/१९९२

प्रति,

प्राचार्य,

चिल्ड्रन वेल्फेअर सेंटर हाय० ॲण्ड ज्यूनि० कॉलेज,
पाटील लेन, वर्सोवा,
मुंबई-४०००६१ (वाणिज्य शाखा)
दूरध्वनी क्र.- ६२६५३८५

विषय:- नवीन कनिष्ठ महाविद्यालयांना विभागीय मंडळाच्या प्रथम मान्यतेबाबत. . . .

संबंधित ~~शिक्षणाधिकारी~~/शिक्षण निरीक्षक व शिक्षण उपसंचालकांच्या शिफारसी विचारात घेऊन आणि शिक्षण उपसंचालकांनी तपासणी अहवालात दर्शविलेल्या त्रुटींची पुर्तता करण्याच्या शर्तीवर मंडळाच्या समुचित प्राधिका-यांनी आपल्या कनिष्ठ महाविद्यालयास सन १९९२-९३ या शैक्षणिक वर्षासाठी (मार्च १९९३ च्या उच्च माध्यमिक शालांत परीक्षेसाठी) मान्यता दिली आहे.

१) आपल्या उच्च माध्यमिक शाळेस खाली नमुद केलेल्या विषयांचे - इंग्रजी -- माध्यमातून अध्यापन करण्यास मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.

२) आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाला जे ३१.१६.० मान्यता क्रमांक(सांकेतिक क्रमांक) देण्यात येत आहे.

३) हा क्रमांक आपल्या कनिष्ठ महाविद्यालयास जो पावेतो शिक्षण उपसंचालकांची मान्यता चालू आहे तो पावेतो कायम राहील.

४) मंडळाशी पत्रव्यवहार करतांना प्रथम वरील मान्यता क्रमांक अवश्य नमुद करावा.

५) उच्च माध्यमिक शालांत परीक्षेच्या आवेदनपत्रात आपल्या उच्च माध्यमिक शाळेचा उपरोक्त क्रमांक (Index No. ) बिनचुक लिहावा.

६) मंडळाने मान्यता दिलेले माध्यम, शाखा आणि विषय या व्यतिरिक्त आपल्या उच्च माध्यमिक शाळेत एखादे नवीन माध्यम, शाखा (Stream ) किंवा विषय सुरु करावयाचे असल्यास किंवा मंडळाने मान्यता दिलेले माध्यम, शाखा आणि विषय यामध्ये काही बदल करावयाचा असल्यास, तर त्यास मंडळ नियमावलीतील मंडळ नियम क्रमांक ६६ नुसार अतिरिक्त विषय म्हणून मंडळ मान्यता घ्यावी लागेल.

७) आपले कनिष्ठ महाविद्यालय काही कारणास्तव बंद झाल्यास तसे या कार्यालयास त्वरित कळविण्यात यावे.

८) आपल्या उच्च माध्यमिक शाळेच्या नावात किंवा पत्त्यात बदल केल्यास याबाबतची या कार्यालयाच्या दप्तरी नोंद होण्यासाठी संबंधित शिक्षण उपसंचालक किंवा शिक्षण निरीक्षक ~~किंवा शिक्षणाधिकारी~~ यांचे शिफारसीसह अर्ज या कार्यालयात सादर केल्यानंतरच आपल्या उच्च माध्यमिक शाळेच्या नवीन नावाची/पत्त्याची नोंद घेतली जाईल अन्यथा जुन्या नावाची/पत्त्याचीच नोंद या कार्यालयाच्या दप्तरी राहील.

९) सदर वरील त्रुटींची किंवा अन्य बाबींची पुर्तता आपणाकडून वेळेवर न झाल्यास आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाची मंडळ मान्यता (सांकेतिक क्रमांक) रद्द करण्यात येईल व याची सर्व जबाबदारी आपल्यावर राहील याची नोंद घ्यावी.

..२/-

Scanned with OKEN Scanner